**प्रतिवादी क्र.१ ते ३ व ५ तर्फे उर्वरीत उलटतपास विद्वान ॲड. श्री.जी.एम.निकम यांचे मार्फतः—**

१६. हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय अधिकारी, अहमदनगर यांच्याकडे इंदुबाई मार्फत तिचा कुलमुखत्यार म्हणजेच माझा मुलगा सतिष भाउसाहेब गोर्डे याने अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसमध्ये मी सामनेवाला होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्या केसचा अदयाप निकाल झालेला नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी आमच्या विरुध्द जी फिर्याद दिली होती त्याचा खटला न्यायालयात प्रलंबित आहे. त्या खटल्यात मला आरोपी केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे जावई सचिन हे सुध्दा आरोपी नाहीत. मला तिन मुली व दोन मुले आहेत. माइया दोनही मुलांचे लग्न झालेले आहेत. सुचेता सचिन गोर्डे हे माझी सुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिने आमच्या विरुध्द नेवासा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती, त्याचा खटला प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, ती फिर्याद तिने तिचा मानसिक व शारिरीक छळ आम्ही केला म्हणुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझा दुसरा मुलगा सतिष याची पत्नी प्रतिभा हिने आमच्या विरुध्द भिंगार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या फिर्यादीची बातमी पेपरमध्ये आली होती.

SUNIL NAGORAO BHOSLE
Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.09.03 13:47:36 +0530

१७. मी बॅकेमध्ये नोकरी करतो. हे म्हणणे खरे आहे की, मला वरिष्ठाने एखादे काम सांगितल्यास बॅकेच्या बाहेर जावे लागते. पोलीस ज्या

वेळेस बॅकेत आले होते त्या वेळेस मला समजले की, माझी सुन प्रतिभा हिने आमच्या विरुध्द फिर्याद दिली होती. प्रतिभा हिने जी फिर्याद दिली होती त्याची बातमी पेपरमध्ये आली होती, त्या पेपरचे नाव मी शपथपत्रात व दाव्यात नमुद केलेले नाही. माझयाकडे जे पोलीस चौकशी करीता आले होते त्यांची नावे मला सांगता येणार नाहीत. ज्या लोकांसमोर माझी बदनामी झाली आहे त्या लोकांचे नावे मी शपथपत्रात व दाव्यात नमुद केलेले नाहीत. सदर बदनामी मुळे माझे किती रुपयांचे नुकसान झाले त्याबाबत दाव्यात व शपथपत्रात नमुद केले नाही. ज्या लोकांनी मला कार्यक्रमाकरीता बोलावले नव्हते त्यांची नावे मी सांगु शकत नाही. ज्या लोकांसमोर माझी बदनामी झाली आहे त्यांची नावे मी दाव्यात नमुद केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सि.स.न.३११, ३१२ व गट नं.१९७ या मिळकती दादाबा दशरथ गोर्डे यांच्या नावे होत्या. हे म्हणणे खरे आहे की, दादाबा गोर्डे यांच्या मृत्युनंतर त्या मिळकती त्यांचा मुलगा प्रतिवादी क्र.२ भारत व मुलगी मंदा प्रकाश इंगळे यांच्या नावे आल्या. हे म्हणणे खरे नाही की, दादाबा गोर्डे यांनी जे मृत्यु पत्र करुन ठेवले ते मला माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या मृत्युपत्राविरुध्द इंदुबाई प्रभाकर साळवे, साखरबाई शिरसाठ यांनी प्रांताधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, सि.स.न.३११, ३१२ व गट नं.१९७ या जागेवरुन आमचे व प्रतिवादीमध्ये वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दि.२१.०५.२०१७ रोजी मी व माझया कुटूंबियांनी प्रतिवादी यांना मारहाण केली. हे म्हणणे खरे आहे की, सदर वादाच्या अनुंषगाने मी व माझया कुटूंबियांनी प्रतिवादी विरुध्द बरेच अर्ज दाखल केले आहेत. हे

SUNIL NAGORAO BHOSLE
Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.09.03 13:47:41 +0530

म्हणणे  खरे नाही की, प्रतिवादी यांना त्रास देण्याकरीता मी खोटा दावा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL NAGORAO BHOSLE
Digitally signed by SUNIL NAGORAO BHOSLE
Date: 2025.09.03 13:47:46 +0530

(**एस.एन.भोसले**)

दिनांक :—०३/०९/२०२५.        दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
नेवासा.